# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 131/2022 दिनांक : 31.03.2022

## 1)खुनः—

**नांदेड ग्रामीण :—**दिनांक 28.03.2022 रोजी चे 06.30 वा. चे सुमारास, **आरोपीचे घरासमोर विनकर कॉलनी, धनेगाव ता. जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे योगेश विलास गिरी रा. विनकर कॉलनी, दुध डेअरी चौका जवळ धनेगाव ता.जि. नांदेड,** यास यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन माझ्या मुलांनी आणलेली खिचडी का खाल्ली अशी विचारणा केल्याचा राग मनात धरुन जिवे मारण्याचे उद्देशाने त्यास शिवीगाळ करुन लाथाबुक्यानी पोटामध्ये व छातीमध्ये गंभीर मारहाण करुन त्याचा खुन केला. वगैरे **फिर्यादी शोभाबाई विलास गिरी, वय 54 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. विनकर कॉलनी, दुध डेअरी चौका जवळ धनेगाव ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 193/2022 कलम 302,504,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री माणीक हंबर्डे, मो.नं. 9823040224** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :—

**1)अर्धापुर :—**दिनांक 03.03.2022 रोजी चे 21.00 वा. चे सुमारास, **पिंपळगाव पाटी येथील विश्वप्रयाग हॉटेल समोर पिंपळगाव शिवार ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंन्डा कंपणीची ॲक्टीव्हा क्रं. एमएच—26/एझेड—4624 किंमती 40,000/—रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी आत्माराम व्यंकटराव कपाटे वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा. येळेगाव ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 82/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2241 तोरणे, मो.क्र. 9096624032** हे करीत आहेत.

**2)विमानतळ :—**दिनांक 28.02.2022 रोजी चे 23.30 वा. ते दिनांक 03.03.2022 रोजीचे 12.30 वा. दरम्यान, **कामठा पान शॉप समोर शाळेजवळ,. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची ज्युपीटर कंपणीची मो.सा. क्रं. एमएच—26/बीएम—5690 किंमती 50,000/—रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी संजय भगवानसिंह ठाकुर वय 26 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. आंबानगर सांगवी, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 111/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1792 लोखंडे, मो.क्र. 9527810006** हे करीत आहेत.

**3)शिवाजीनगर :—**दिनांक 29.03.2022 रोजी चे 22.00 वा. ते दिनांक 30.03.2022 रोजीचे 11.00 वा. दरम्यान, **अभ्युदय लाईफ केअर हॉस्पीटल पार्कींग मधुन, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पॅशन प्रो. कंपणीची मो.सा. क्रं. एमएच—12/जीएक्स—6452 किंमती 30,000/—रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी डॉ. संतोष रामराव मेकेवार वय 40 वर्षे, रा. तिरुमला नगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 117/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2547 वाघमारे, मो. क्र. 9766014795** हे करीत आहेत.

## 3)जनावर चोरी :—

**अर्धापुर :—**दिनांक 15.02.2022 रोजी चे 18.00 वा. ते दिनांक 16.02.2022 रेजी चे 07.00 वा. दरम्यान, **फिर्यादीचे शेतातुन मौजे देळुब ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** फिर्यादीचे दोन बैल किंमती 70,000/—रुपयाचे यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी सुनील सुभाषराव थोरात, वय 34 वर्षे, व्यवसाय शेती रा. देळुब ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 80/2022 कलम 379,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/1279 चव्हाण, मो. क्र. 9356283717** हे करीत आहेत.

## 4)अपघात :—

**1)नायगाव :—** दिनांक 26.03.2022 रोजी 16.30 वा. चे सुमारास, **जयराज पाटील यांचे शेता जवळील रोडवर मांजरम शिवार ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे संतोष देवराव डाकोरे वय 40 वर्षे रा. हिप्परगा माळ ता. बिलोली जि. नांदेड** यांनी आपली मोटार सायकल क्रं. एमएच/26—डीके—7284 ही हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन डिवायडर ला स्वतः धडक दिल्याने गंभीर जखमी होवुन स्वतःचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी मनोहर देवराव डाकोरे वय 45 वर्षे व्यवसाय शेती रा. हिप्परगा माळ ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरनं. 59/2022 कलम 279,338,304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री बाचावार, मो.क्र. 9637320355** हे करीत आहेत.

**2)मनाठा :—** दिनांक 25.03.2022 रोजी 20.15 वा. चे सुमारास, **वारंगा ते हदगाव जाणारे हायवे रोडवर शिबदरा पाटीच्या जवळ रोडवर ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी गुत्तेदार यांने वाहन चालकाची सुरक्षीतता तसेच वाहन अपघात टाळण्यासाठी पुर्व सुचना म्हणुन महामार्गावर कोणतेही दिशा दर्शक फलक, चिन्हे रेडीयम, रिप्लेक्टर, किंवा सुचना दर्शक फलक न लावता कामा मध्ये हयगय व निष्काळजीपणा करुन महामार्गावर वाहतुकीच्या रस्त्यात मुरमाचे ढिग टाकून रस्ता बंद केला त्यामुळे मो.सा. क्रं. एमएच/26—बीयु—7970 वरील तीन इसम यांना सदरचा रस्ता बंद असल्याचे लक्षात न आल्याने ते मुरमाच्या ढिगाऱ्यावरुन मोटार सायकल वरुन जात असताना रस्त्यावर पडुन त्यांचे डोक्याला व हाताला गंभीर दुखापत होवुन त्यापैकी **मयत नामे 1) सटाजी संभाजी सुर्यवंशी वय 53 वर्षे (2) माधव विठ्ठल बोंढारे दोघे रा. हरडप ता. हदगाव जि. नांदेड** हे दोघे जागीच मरण पावले व एक जखमी झाला त्याचे मरणास व दुखापतीस यातील नमुद आरोपी जबाबदार आहे. वगैरे **फिर्यादी आनंदा लक्ष्मण वाघमारे वय 38 वर्षे पो.स्टे. मनाठा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरनं. 62/2022 कलम 304(अ),337,338,283 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री चव्हाण, मो.क्र. 9049851871** हे करीत आहेत.

## 5)पळवुन नेले :—

**लोहा :—** दिनांक 26.03.2022 रोजी चे 16.30 वा. सुमारास, **हुंडे हॉस्पीटल समोरील चहाचे टपरी येथुन लोहा ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा **पती नामे नामदेव गोटु राठोड वय 45 वर्ष रा. श्रीरामनगर मराठा गल्ली जवळ लोहा ता. लोहा जि. नांदेड** यास यातील नमुद आठ ते नऊ लोकांनी ऊस तोडीचे कामासाठी उचलेले पैसे देण्याघेण्याचे कारणावरुन कट रचून बळजबरीने एरटिगा कार मध्ये कोंबून पळवून नेवून कोठेतरी अज्ञात ठिकाणी डांबुन ठेवले आहे. वगैरे **फिर्यादी सिंधुबाई नामदेव राठोड, वय 40 वर्षे, व्यवसाय घरकाम व शेती रा. श्रीरामनगर मराठा गल्ली लोहा ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 71/2022 कलम 365,342,120(ब) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्रीमती काळे**, **मो.क्र. 9922391720** हे करीत आहेत.

## 6)भारतीय हत्यार कायदा :—

**धर्माबाद :—** दिनांक 30.03.2022 रोजी 11.05 वा. चे सुमारास, **मौजे येवती फाटा वाय पाईंट जवळ लालु भुरोड यांचे शेता समोरील सार्वजनिक रोडच्या कडेला धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीने विनापरवाना बेकायदेशीर रित्या एक गावठी पिस्टल व एक जिवंत काडतुस नमुद ठिकाणी फेकुन दिलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री विजय लिंगुराम पंतोजी, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 87/2022 कलम 3/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री सय्यद, मो.क्र. 7758081445** हे करीत आहेत.

## 7)जुगार :—

**1)इतवारा :—** दिनांक 29.03.2022 रोजी चे 20.00 वा. चे सुमारास, **गीरधरसिंह जम्मुसिंह ठाकुर यांचे राहाते घरी गाडीपुरा,नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना 38,550/—रुपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री गणेश अशोक गोटके, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 60/2022 कलम 4,5 म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/436 मोकले**, **मो.क्र. 9146663355** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद :—** दिनांक 30.03.2022 रोजी चे 14.10 वा. चे सुमारास, **महमुद फॅक्शन हॉल,नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या मिलन डे नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 1750/—रुपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/152 मनोज बापुसिंग परदेशी, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 92/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/1007 अनिल झांबरे**, **मो.क्र. 9923922533** हे करीत आहेत.

## 8)कोरडया विहरीत उडी मारुन आत्महत्या :—

**1)माळाकोळी** :—दिनांक 30.03.2022 रोजी चे 01.00 वा. सुमारास, **शेतातील विहीर मौजे माळेगाव ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे तुकाराम माधवराव धुळगुंडे वय 33 वर्षे, व्यवसाय शेती रा. माळेगाव ता. लोहा जि. नांदेड**, यांनी सततचे नापीकीस व बॅकेचे कर्जास कंटाळुन मानसिक त्रासाने स्वतःचे विहीरीत उडी मारुन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार देवराव आच्युतराव धुळगुंडे वय 25 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. माळेगाव ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे माळाकोळी** आ. मृ. **06**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मुंडे, मो.नं. 9552427777** हे करीत आहेत.

## 9)पाण्यात बडुन मृत्यु :–

**मुखेड :–**दिनांक 30.03.2022 रोजी चे 16.30 वा. चे सुमारास, **मन्याड नदी मध्ये मौजे कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे नागेश वसंत उदबुके, वय 21** वर्षे, **व्यवसाय मेंढपाळ रा. नारनाळी ता. कंधार जि. नांदेड**, हा मन्याड नदीचे पात्रात पाण्यात अंघोळ करण्यासाठी गेला असता पाण्यात बुडून मरण पावला. वगैरे **खबर देणार वसंत बाबाराव उदबुके, वय 42** वर्षे, **व्यवसाय मेंढपाळ रा. नारनाळी ता. कंधार जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे मुखेड** आ. मृ. **13**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2636 चिंचोरे, मो.नं. 8805957400** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 132/2022 दिनांक : 31.03.2022**

## नांदेड पोलीस दलातील तीन अधिकारी व सात पोलीस अंमलदार सेवा निवृत्त

नांदेड पोलीस दलातील तीन अधिकारी व सात पोलीस अंमलदार यांचा नियत वयोमानानुसार दिनांक 31.03.2022 रोजी सेवानिवृत्त होत आहेत. **मा. पोलीस अधिक्षक श्री प्रमोद शेवाळे साहेब, व** अपर पोलीस अधिक्षक,भोकर **मा. श्री विजय कबाडे साहेब,** अपर पोलीस अधिक्षक **मा. श्री निलेश मोरे साहेब,** पोलीस उपअधिक्षक मुख्यालय नांदेड **मा. डॉ. अश्विनी जगताप,** यांचे हस्ते सर्व दहा सत्कार मुर्तींना पुष्पगुच्छ, शाल श्रीफळ व भेट वस्तु देवुन सत्कार करण्यात आला. सदर सत्कार समारंभ पोलीस अधिक्षक कार्यालयात पार पडला. सदर सत्कार समारंभास. पोलीस कल्याण शाखेचे **पोनि श्री अनिरुध्द काकडे, पोनि श्री बी.एम. नरुटे** जनसंपर्क अधिकारी **सपोनि श्री शिवाजी लष्करे तसेच ईतर शाखेचे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी** मोठया संख्येने हजर होते. तसेच मपोकॉ राखी कसबे, यांनी कार्यक्रमाचे नियोजन चांगल्या प्रकारे केले. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मपोकॉ रुपा कानगुले यांनी केले.

| अ.क्र. | हुद्दा | सेविनिवृत्त अधिकारी/कर्मचारी नाव | नेमणुक |
|---|---|---|---|
| 01 | पोलीस उप–अधिक्षक | गोपाळ गोविंदराव रांजनकर | उप–विभाग भोकर |
| 02 | पोलीस उप–अधिक्षक | विलास महादेव जाधव | उप–विभाग माहुर |
| 03 | पोलीस उप निरीक्षक | अम्रता महादेव केंद्रे | पो.स्टे. लिंबगाव |
| 04 | सपोउपनि/5252 | रमेश रामदास जाधव | पो.स्टे. किनवट |
| 05 | सपोउपनि/5210 | इकरामउल्ला अहमदुल्ला सय्यद | गु.सं.पथक, नांदेड |
| 06 | सपोउपनि/5189 | सुरेश नारायण पुरी | पो.स्टे. नांदेड ग्रामीण |
| 07 | सपोउपनि/5046 | दादाराव विठ्ठलराव केंद्रे | पो.स्टे. नायगाव |
| 08 | पोह/2244 | बालाजी लाकडोजी भंगर्गे | पो.स्टे. लोहा |
| 09 | पोह/880 | रामदास ज्ञानोबा तिडके | पो.मु. नांदेड |
| 10 | पोह/510 | रमेश गंगाधर संकुरवार | पो.मु. नांदेड |

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड**

